मुख्य लेखा व वित्त विभाग
पुणे महानगरपालिका
जा.क्रं. :- मुले/ 222e
दिनांक :- 3।11।2020

मा. सर्व संबंधीत खातेप्रमुख
पुणे महानगरपालिका.

## कार्यालय परिपत्रक

विषय:- पुणे महानगरपालिकेच्या **Credit** Rating बाबतची माहिती मिळणेबाबत.

पुणे महानगरपालिकेस **सन २०१८-१९** मध्ये AA+ क्रेडीट रेटींग मिळाला असून प्रतिवर्षी याबाबत सर्व्हेलन्स ची कार्यवाही करण्यात येते.

त्यानुसार सन २०१९-२० साठीची सर्व्हेलन्सची कार्यवाही सुरू करण्यात आलेली असून याबाबत खालील मुद्यानुसार आपल्या खात्याकडील माहिती विस्तृत स्वरूपात पाठविणे आवश्यक आहे.

१. मागणी व गोळा रक्कम (Demand & Collection) efficiency (उदा. कर आकारणी व कर संकलन कार्या., पाणीपुरवठा कार्या., मालमत्ता व्यवस्थापन,अतिक्रमण,आकाशचिन्ह विभाग)
२. पुढील ३--५ वर्षात आवश्यक असणाऱ्या प्रकल्पानुसार निधी. ( उदा. पाणीपुरवठा कार्या., पथ कार्या., प्रकल्प कार्या., भवन रचना कार्या., आरोग्य कार्या., मलनिःसारण विभाग)
३. सर्व्हिस लेव्हल बेंचमार्क ( % coverage ) पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, मलनिःसारण विभाग.
४. पुढील ३ वर्षात कर्ज स्वरूपाने आवश्यक असलेली रक्कम प्रकल्पानुसार.
५. पुणे महानगरपालिकेकडील रक्कम रू. १० कोटी पेक्षा जास्त असलेल्या चालू व प्रस्तावीत प्रकल्पांची माहिती.
६. पुणे महानगरपालिकेकडील विविध खात्याकडील ( reform initiative )

वरील सर्व बाबी लक्षात घेता संबंधीत खातेप्रमुख यांनी वैयक्तिक लक्ष घालून सदर माहिती पुढील १५ दिवसात पाठविण्यात यावी. सदर माहितीच्या आधारे पुणे महानगरपालिकेचे क्रेडीट रेटिंग ठरणार असून याबाबत आपणाकडून वरील माहिती ही अचुक ,सुस्पष्टपणे सादर करणे आवश्यक आहे.

मा.स.कळावे.

2.11.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पुणे महानगरपालिका.

19